# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ११/०२/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### खून

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत १६ कि. मी अंतरावरील मौजा भुगाव शिवार एकर्डी रोड येथे दिनांक ०७/०२/२०२२ चे १९.०० वा. दरम्यान फिर्यादीचा लहान भाउ नामे– **नितीन शिवदास राजपांडे (मृतक), वय २६ वर्ष, रा. भुगाव ता.कामठी जि. नागपुर** व आरोपी नामे– विशाल गुनवंता नारनवरे वय २३ वर्ष रा. वार्ड नं. ०३ वरंभा ता.कामठी जि. नागपुर हे दोघेही एकाच मोटरसायकल क्र. एम एच– ४९/एम– ९७७९ वर बसुन हल्दीराम कंपनी येथे गार्डचे डयुटीवर भुगाव येथुन एकर्डी रोड ने जात होते. त्यादरम्यान त्याच्यांत वाद होउन फिर्यादीचे भावाने आरोपीस शिविगाळ केले यावरून आरोपीने त्याचे डोक्यावर लोखंडी बत्याने ठिकठिकानी वार करून पुरावा नष्ट करन्याच्या उदेशाने सदरचे प्रेत रोड लगत असलेल्या नालीत टाकले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सचिन शिवदास राजपांडे, वय २८ वर्ष, रा. भुगाव ता. कामठी जि.नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, २०१ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सोनेकर मो.क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. काटोल :–** अंतर्गत खैरी टोला येथे दिनांक ०९/०२/२०२२ चे १६.०० वा. ते १०/०२/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– यमुनाबाई बापुराव पाचंग, वय ५२ वर्ष, रा. खैरी टोला ता. काटोल यांचे कुडा काठीच्या खुल्या घरात अज्ञात आरोपीने प्रवेश करून लोखंडी पिप्यात ठेवलेले सोन्याचे दागिने किंमती ५०,०००/–रू. व चांदीचे दागिने किंमती १५,०००/–रू. तसेच नगदी ६,०००/–रू. पिप्यात ठेवलेले होते असा एकुण कि. ७१,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक अविनाश बाहेकर पो. स्टे. काटोल मो.नं. ८३०८४०५३७३ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कन्हान**:— दिनांक १८/१२/२०२१ चे १९.३० वा. ते २०.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय २१ वर्ष ही कामावरुन घरी परत जात असतांना आरोपी नामे— दिपक ठाकुर प्रसाद गुप्ता, वय ४० वर्ष, रा. इंदर कॉलरी खदान न. ६ कन्हान ता. पारशिवनी जि. नागपुर याने फिर्यादीचा रस्ता अडवून 'माझ्या मोटार सायकलवर बसुन सोबत चल' असे म्हटले. यावरून फिर्यादीने आरोपीस नकार दिला असता आरोपीने फिर्यादीचा हात पकडून बळजबरीने त्याच्या मोटार सायकलवर बसवित होता. त्यावरुन फिर्यादी हीने आरोपीकडून आपला हात सोडवून घराकडे जात असता तिचा घरापर्यंत पाठलाग करुन फिर्यादी हीच्या घरी आला होता. तेव्हा फिर्यादीची आई या घरा समोरील रोडवर पाणी टाकुन साफ सफाई करीत असतांना आरोपी याने फिर्यादीचे आईला अश्लिल भाषेत बोलुन शिवीगाळ केली. तेव्हा फिर्यादी व तिचे आईने आरोपीस हटकले, तरी सुध्दा आरोपी हा अश्लिल भाषेत शिवीगाळ करीत होता. फिर्यादी ही खजगी नौकरी करीत असल्याने तीला सुटी मिळत नसल्याचे कारणामुळे तीने दिनांक १०/०२/२०२२ रोजी पो.स्टे. कन्हान येथे रिपोर्ट नोंदविली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (ड), ३९४, ५०९, ५०६, ३४१ भादंवी. ३ ३(१) (आर) ३(१)(डब्लु) (i)(ii) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी कन्हान विभाग श्री मुख्त्यार बागवान हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा वारेगाव येथे दिनांक १०/०२/२२ चे १४.१५ वा. ते १५.०० वा. दरम्यान आरोपीने आपल्या ताब्यातील टिप्पर क्र एमएच— ४०/बिजी— ०७८६ भरघाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन हिरो होंडा प्लस गाडी क्र. एमएच— ४०/सीई— ६०२४ ला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे— सलफाज मेहमुद कुरेशी, वय २८ वर्ष, रा. खापरखेडा, वार्ड क्र. ४ यांच्या मृत्यु झाला. तर घटनेनंतर टिप्पर चालक आरोपी हा वाहन सोडुन घटणास्थळावरून पसार झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मोहम्मद असलम मोहम्मद मुस्तफा कुरेशी, वय ४४ वर्ष, रा. वार्ड नं ०४ इंदिरा नगर, आबादी खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९ ३०४ (अ) भादवी १८४, १३४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. राजेश पीसे मो नं ८७८८२४५१५२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. भिवापुर** :— अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मेंढा फाटा येथे दिनांक १०/०२/२०२२ चे सायं ०६.०० ते ०६.३० वा. दरम्यान ट्रॅक्टर ट्रॉली क्र. एमएच— ४०/बीजे— ५८१४ चा चालक आरोपी/मृतक नामे— सचिन कृष्णा उईके वय २७ वर्ष, रा. रानमांगली ता. भिवापुर याने आपल्या ताब्यातील असलेले ट्रॅक्टर ट्रॉली वरती शेतीचे माल खाली करून मेंढा वरून भिवापूर कडे जात होता. त्यादरम्यान त्याने आपले ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली वाहन भरधाव वेगाने व हयगयीने चालवुन ट्रॅक्टर चे ट्रॉली उलटली. या अपघातात सचिन उईके हा गंभीर जखमी होवुन स्वताचे मरनास कारनीभुत ठरला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार उमेश झिंगरे पो.स्टे. भिवरपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवरपुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. चनगोले पोस्टे खापरखेडा मो नं ७९७२४४१८४६ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत खानगाव अंडरब्रीज चे अगोदर सावनेर येथे दिनांक १०/०२/२०२२ चे ००.०५ वा. दरम्यान अज्ञात अरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून मोटार सायकल क्र एम.एच–४०/बीपी– १७८९ ला धडक दिली. या अपघातात मोटसायकल स्वार फिर्यादीचा चुलत भाऊ मृतक संजय सोहंगलाल मालापुरे, वय ३८ वर्ष याचे जागीच मरणास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजहंस सुखलाल मालापुरे वय ३९ वर्ष, रा. मंगसा ता सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावेनर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी १८४, १३४(१), १७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार शिंदे मोनं. ९८२२९३२२५३ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०६ कि. मी. मौजा मौजा डब्लु सी एल वेकोली उमरेड येथे दिनांक ०८/०५/२०२१ चे १२.०० वा. ते दिनांक २६/०६/२०२१ चे ००.०० वा. दरम्यान आरोपी नामे– १) पुरूषोत्तम सुधाकर शिरसाट रा अकोला २) रवी बोबडे, रा नागपुर व ३) रवी मसराम रा उमरेड यांनी संगणमत करून फिर्यादी नामे– धनंजय रमेश चव्हाण वय ६० वर्ष रा कारंजा जि वाशिम योना म्हटले की, ‘तुमच्या नातेवाइकास व मुलाला डब्लु सी एल येथे नोकरी लावुन देतो’ असे आमिष दाखवुन वेळोवेळी त्यांच्यांशी फोनव्दारे व प्रत्यक्ष संपर्क करून त्याच्या कडुन एकुण १८,००,०००/–रू. आर्थिक फसवणुक केली आहे व नौकरी लावुन दिले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री खोब्रागडे हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**